You Tube Live
LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | गुरूवार, दि. १४ एप्रिल २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

## कारच्या भिषण अपघातात दोन महिला ठार

### ● पाच जण गंभीर जखमी, वणी परिसरातील भावीक

■ अपघातात वरझडी बंडा येथिल चंद्रभागा सुधाकर गौरकार व मनीषा रोगे या दोन महिलांचा मृत्यू झाला असून, भाग्यश्री मनोज रोगे (२६), सावी मनोज रोगे (४), सविता रमेश हरडे (४५) व वणी येथील अनिरुद्ध महादेव तपासे व त्याचे वडील महादेव रामराव तपासे हे जखमी झाले असल्याची माहिती मिळाली आहे.

**वरोरा / प्रतिनिधी**

वणी तालुक्यातील वरझडी बंडा येथिल दोन महिला ठार झाल्या असून तिन जण जखमी झाले आहे, तर वणी येथील वाहन चालक व त्याचे वडील असे दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.



सविस्तर असे की, वणी येथील आनंद नगर मधील रहिवासी असलेले अनिरुद्ध महादेव तपासे (३५)वाहन चालक व महादेव रामराव तपासे (५८) तसेच वरझडी बंडा येथिल चंद्रभागा सुधाकर गौरकार (४५), सविता रमेश हरडे (४५), मणीषा रोगे (३५), भाग्यश्री मनोज रोगे (२६) व सावी मनोज रोगे (४) हे दि. १२ एप्रिल ला भद्रावती येथिल नागमंदीरात स्वयंपाकासाठी गेले होते. स्वयंपाक आटोपून व देवदर्शन घेऊन रात्री ९ वाजता दरम्यान आपल्या स्विप या स्वीफ्ट वाहनाने वणीकडे निघाले होते. दरम्यान वरोरा जवळील नंदोरी फाट्या जवळ त्यांच्या वाहनाला एका भरधाव ट्रक ने कट मारल्याने कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्यांचे वाहन पलटी झाले.

## भूमिअभिलेख कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

### ■ तब्बल ५ वेळा मोजणी होवूनही प्रत्येक मोजणीत फरक : ग्रामपंचायत चे आमदारांना निवेदन



" सदर अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांनी दिलेल्या धमकीला घाबरून सदर मोजणीचे सीमांकन केलेले नाही. सदर मोजणी पूर्ण न केल्यास आम्ही सर्व भूमीअभिलेख कार्यालया समोर उपोषण करू.

**- चंद्रभान कामडी, उपसरपंच ग्रा.प. नेरी**

" सदर जागेच्या संदर्भात मी पहिल्यांदा पूर्वीची मोजणी बरोबर असल्याची माहिती दिली. मात्र दक्षिण भागाकडे गेलो असता मोजणीची जागा बरोबर नसून फरक पडत असल्याचे मला आढळले. एक तर यापूर्वी झालेल्या मोजणीत चुका असतील किंवा मी केलेल्या मोजणीत चुका असतील त्यामुळे सदर मोजणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पुन्हां करण्यात येईल.

**- निलेश रायपूरे, भूकरमापक**

**चिमूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरी येथील स्मशानभूमी मागील अनेक दिवसांपासून चर्चेत असून या स्मशानभूमीच्या जागेची हद्द कायम व्हावी याकरिता तब्बल ५ वेळा मोजणी करण्यात आली. मात्र प्रत्येक मोजणीत फरक येत असल्याने भूमिअभिलेख कार्यालयाच्या कामावर संशय व्यक्त होत असून भूमिअभिलेख कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आलेला आहे.

नेरी येथील स्मशानभूमीत अनेकांनी अतिक्रमण करून स्मशानभूमीची अर्ध्यापेक्षा जागा गिळंकृत केली आहे . त्यामुळे अंत्यविधी करीता जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे .या बाबीची दखल घेत ग्रामपंचायत नेरी यांनी मोजणी करून जागा खुली करण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयात पैसे भरून मोजणी केली. मात्र प्रत्येक मोजणीच्या खुणा वेगवेगवेगळ्या येत असल्याने मोजणीवर संशय निर्माण होत आहे.

१३ एप्रिल रोजी ला स्मशानभूमी लगत असलेल्या शेतकऱ्याने मोजणी केली. याकरिता भूमिअभिलेख कार्यालय चिमूर यांनी निलेश रायपूरे व सहकारी यांना पाठविले सुरुवातीस सदर स्मशानभूमीच्या जागेवर गाडलेले खांब योग्य असल्याचे त्यांनी सांगितले मात्र त्याचवेळेस शेतकऱ्यांच्या वतीने कोर्टात जाण्याचा इशारा देताच अधिकाऱ्यांनी संबंधीत शेतकऱ्याची जागा स्मशानभूमीकडे निघत असल्याचे सांगितल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्यांनी केला असुन सदर स्मशानभूमीचे सीमांकान योग्य रित्या करून न्याय न दिल्यास गावकऱ्यांच्या वतीने संपूर्ण ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्यांसह भूमिअभिलेख कार्यलयसमोर उपोषणाला बसणार असा इशारा दिला आहे .

या गंभीर बाबीची दखल घेऊन ग्रामपंचायत सदस्यांना होणारा मानसिक त्रास बंद करण्यासाठी व ८.५० एकरचा सातबाऱ्याची जागा उपलब्ध करून देण्याकरिता आमदारांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामुळे अश्या बदलणाऱ्या मोजणीवर, मोजणी अधिकारी व मोजणी कार्यालयावर भरोसा कसा ठेवायचा असा प्रश्न निर्माण होत असून या मोजणीच्या अनुषंगाने भूमीअभिलेख कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आलेला आहे.

## चंद्रपूरसह राज्यातील इतर वीज उत्पादक जिल्ह्यांना भार नियमनातून मुक्त करा : आ. किशोर जोरगेवार

### मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची मंत्रालयात भेट घेत केली मागणी



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

राज्यभरातुन विजेचे मागणी वाढल्यामुळे राज्यात भार नियमन लागु होण्याची शक्यता आहे. मात्र या भार नियमनातुन चंद्रपूरसह राज्यातील ईतर विज उत्पादक जिल्ह्यांना वगळण्यात यावे अशी मागणी चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची मंत्रालयात भेट घेत केली आहे. सदर मागणीचे निवेदनही त्यांच्या वतीने मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना देण्यात आले आहे. तसचे वीज उत्पादक जिल्हांना २०० युनिट वीज मोफत देण्यात यावी या विषयावरही आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याशी चर्चा केली आहे.

सद्यस्थितीत राज्यात विजेच्या प्रत्यक्ष उत्पादनापेक्षा मागणी जास्त असल्याने वीज टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. राज्यात विजेचे वाढती मागणी आणि पुरवठा यांचे साधर्म्य साधण्याकरिता नागरिकांवर वीज भार नियमन चे संकट उभारले आहे. मागील काही दिवसांपासून उन्हाचा कडाका बर्यापैकी वाढला आहे. जगातील उष्ण शहरांमध्ये राज्यातील चंद्रपूर सह इतर शहरेसुद्धा समाविष्ट आहे. आणि हे शहरे प्रामुख्याने वीज उत्पादक आहे. औष्णीक विज प्रकल्पांमुळे दरवर्षी या शहरांमधील नागरिकांना तीव्र प्रदूषणासह उष्ण तापमानाचा तडाखा सहन करावा लागत असतो. अशात भारनियम लागु झाल्यास एक प्रकारे नरक यातनाच येथील नागरिकांना सहन कराव्या लागतील त्यातच शेतकर्यांच्या उन्हाळी व भाजीपाला पिकांना नियमित व मुबलक पाणी पुरवठा करणारे कृषी पंप विजेअभावी बंद राहिल परिणामी प्रदुषनासह आता विज कपातीचे दुहेरी संकट त्यांच्या पिकांवर येणार आहे.

चंद्रपूरसह इतर वीज उत्पादक जिल्ह्यातील नागरिक औष्णिक वीज प्रकल्पानमुळे तीव्र प्रदूषण आणि उच्च तापमान वाढीमुळे प्रचंड त्रास सहन करीत असल्याने सदर प्रकल्पांविरोधात त्यांच्यात नाराजी आहे. त्यामुळे सदर विज उत्पादक जिल्ह्यात भार नियमन लागु करण्यात आल्यास विज प्रकल्पांना नागरिकांच्या रोषाला समोर जावे लागण्याची शक्यताही नाकारता येत आहे. अशात विज प्रकल्पांविरोधात आंदोलने उभी राहण्याची शक्यता आहे. त्यामूळे या सर्व बाबींचा विचार करत वीज उत्पादक जिल्हांना कायमस्वरूपी भार नियमनातून मुक्त करावे, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना केली आहे. सोबातच वीज उत्पादक जिल्हांना विशेष दर्जा देत सदर जिल्हांना घरगुती वापरातील २०० युनिट वीज मोफत देण्यात यावी अशी मागणी पुन्हा एकदा आमदार किशोर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली आहे. याबाबत त्यांच्याशी चर्चाहि यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

## गळफास घेवून युवकाची आत्महत्या

**चिमूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरी येथील गांधी वार्ड क्र. ४ येथील २४ वर्षीय तरुण नामे मेघश्याम विठोबा नन्नावरे याने आपल्या राहत्या घरीच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १३ एप्रिलला सकाळी उघडकीस आली .

नेरी येथील मेघश्याम हा तरुण पुणे येथील खासगी कंपनी येथे मागील अनेक वर्षांपासून धाकट्या भावासोबत कामाला होता. आई वडिलांचा मृत्यू झाल्याने त्यांनी गाव सोडले होते. परंतु काही कामानिमित्त मेघश्याम हा काही दिवसापुर्वी नेरी येथे आला. घरी एकटाच राहायचा दरम्यान काल रात्रीच्या वेळेस त्याने आपल्या राहत्या घरीच मजबुत दोरीच्या सहाय्याने घराच्या फाट्याला बांधुन गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर घटना ही १३ एप्रिला उजेडात आली वृत्त लिहिपर्यत म्रृत्युचे कारण कळू शकले नाही सकाळी त्या परीसरात आजुबाजुच्या नागरिकांना गळफास घेतल्याचे दिसुन आले.

## कुरूल येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती



**मोहोळ / प्रतिनिधी**

तालुक्यातील कुरूल येथील जि. प प्राथमिक शाळेत ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .

यावेळी या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अतुल ननवरे तर प्रमुख अतिथी म्हणून नानासाहेब ननवरे , दत्तात्रय चव्हाण, कुरुल ग्रामपंचायत सरपंच माणिक पाटील, शाळेचे मुख्याध्यापक मुचांडे हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाल सुरवात करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी केले.

या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांना माळी सेवा संघ महाराष्ट्र राज्य संघटना मोहोळ तालुका युवा अध्यक्ष अतुल ननवरे व नानासाहेब ननवरे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी, महादेव महाराज माळी, औदुंबर साळुंके, धनाजी माळी, पांडुरंग माळी, अशोक क्षीरसागर, लक्ष्मण भालेराव, श्रीपती डुणे, संतोष (बंडु) जाधव, संतोष जाधव, सुरेश माळी सुभाष माळी तथा ग्रामस्त उपस्थित होते.

## नायब तहसीलदार यांच्या पदोन्नती प्रक्रिया पुर्ण करा तथा महसुल सहायकांचे रिक्त पदे भरा : आ. किशोर जोरगेवार

### महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यांची भेट घेत मागणी

■ नागपूर, कोकण, नाशिक तसेच इतर विभागाचे अव्वल कारकून संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नतीचे प्रस्ताव मंत्रालयात दिड ते दोन वर्षापासून प्रलंबित ठेवण्यात आले आहे. तसेच महसूल विभागातील सहायकाची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त ठेवण्यात आली आहे.

■ परिणामी कर्मचा-यांचा अभाव निर्माण झाला असून एका महसूल सहायकाला दोन ते तिन संकलनाचा कार्यभार सांभाळावा लागत असल्याची बाब यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या लक्षात आणून दिली. तसेच महसूल कर्मचा-यांच्या मागण्या न्यायक असून त्या सोडविण्यात यावा अशी मागणी केली आहे.

■ यावेळी सदर मागणी संदर्भात आमदार किशोर जोरगेवार यांची महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून या संदर्भात आजच बैठक घेत सदर मागण्या सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न केल्या जातील असे आश्वासन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आ. जोरगेवार यांना दिले आहे.



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

अव्वल कारकून संवर्गातुन नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नती प्रक्रिया मागील दोन वर्षापासुन थांबली आहे. तसेच महसुल सहायकाचे पदे भरण्यात आलेली नाही. त्यामूळे सदर पदोन्नती प्रक्रिया पुर्ण करुन महसुल सहायकाचे रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यांना केली आहे. या संदर्भात आजच संबधित विभागाची बैठक घेत निर्णय घेणार असल्याचे आश्वासन ना. बाळासाहेब थोरात यांनी आ. जोरगेवार यांना दिले आहे.

आज बुधवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई येथील मंत्रालयात महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यांची भेट घेत सदर मागणी बाबत सविस्तर चर्चा केली. या मागणी करिता चंद्रपूरात महसुल विभागाच्या कर्मचा-यांचे सुरु असलेल्या आंदोलना बाबतही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी ना. बाळासाहेब थोरात यांना माहिती दिली.

विविध मागण्यांसाठी चंद्रपूरात सुरु असलेल्या महसूल कर्मचा-यांच्या आंदोलनाला काल मंगळवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट देत कर्मचा-यांच्या मागण्या समजून घेतल्या होत्या. यावेळी कर्मचा-यांच्या मागण्या महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यापूढे मांडण्याचे आश्वासन आमदार किशोर जोरगेवार यांनी आंदोलक कर्मचा-यांना दिले होते. त्यांनतर आज बुधवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबई येथील मंत्रालयात बाळासाहेब थोरात यांची भेट घेत महसूल कर्मचा-यांच्या मागण्या त्यांच्या पूढे ठेवल्यात.

## रेल्वे भूखंडावरील कुटुंबांना बेघर करू नका !

### ● बल्लारपूर, चंद्रपूर, माजरी येथील अतिक्रमण कारवाई मागे घेण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

### ● विभागीय रेल्वे प्रबंधकांची घेतली नागपुरात भेट

**नागपूर / प्रतिनिधी**

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू असताना एकीकडे विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वांना घरे देण्याचा आग्रह करीत आहेत आणि दुसरीकडे रेल्वे ने ४०-५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या व स्थायिक झालेल्या नागरिकांना बेघर करण्याच्या दृष्टीने नोटीस बजावणे हे अत्यंत दुःखदायी असून या कुटुंबांना दिलासा देण्यात यावा व अतिक्रमणाची कारवाई मागे घेण्यात यावी' अशी आग्रही मागणी लोकलेखा समिती प्रमुख आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आज रेल्वेच्या विभागीय प्रबंधक श्रीमती ऋचा खरे यांना केली.

चंद्रपूर येथील दूध डेअरी परिसर, बल्लारपुर शहरातील शांतीनगर आणि भद्रावतीच्या माजरी खदान येथील रेल्वे भूखंडावर वास्तव्यास असलेल्या नागरिकांना बजावलेली अतिक्रमण नोटीस मागे घेऊन त्यांना दिलासा द्यावा अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आज विभागीय रेल्वे प्रबंधक श्रीमती खरे यांच्याकडे केली.

या विषयाबाबत मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय रेल्वे प्रबंधक कार्यालयात आ. मुनगंटीवार यांनी मंगळवार, दि. १२ एप्रिल रोजी श्रीमती खरे यांची भेट घेतली. चंद्रपुरातील दूध डेअरी परिसर, बल्लारपुर शहरातील शांतीनगर आणि भद्रावती येथील माजरी खदान येथील रेल्वे भूखंडावर गेल्या ४०-५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना रेल्वेने नोटीस पाठविली आहे; हे बांधकाम रेल्वे विभागाने काढू नये, अशी आग्रही मागणी आ. मुनगंटीवार यांनी आज केली.



या भूखंडांवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांना विविध स्थानिक स्वराज्य संस्थांनी मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्याकडुन नियमितपणे कर वसुलीही होत आहे. अशात त्यांना अचानकपणे हटविल्यास या नागरिकांच्या उदरनिर्वाह, वास्तव्य व भविष्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे आ. मुनगंटीवार यांनी विभागीय रेल्वे प्रबंधक खरे यांच्या निदर्शनास आणून दिले.

मानवीय दृष्टिकोन ठेवत येथील नागरिकांना हटविण्यात येऊ नये, असे आ. मुनगंटीवार यावेळी म्हणाले. यापूर्वी आ. मुनगंटीवार यांनी ११ एप्रिल रोजी चंद्रपुरात नागरिकांची बैठक घेतली होती.

त्यावेळीच त्यांनी विभागीय प्रबंधक यांना विनंती करू असे या भूखंडावरील नागरिकांना दिले होते; या नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांपर्यंत हा मुद्दा लाऊन धरू, असे आ. मुनगंटीवार यांनी बैठकीनंतर सोबत असलेल्या शिष्टमंडळास सांगितले; मुद्दा निकाली निघेपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असे यावेळी आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. बल्लारशाहतील शांतीनगर, मूल, माजरी येथील रेल्वे भूमिवरील नागरिकांबाबत यापूर्वी आ. मुनगंटीवार यांनी नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती, हे विशेष.

रेल्वेच्या विभागीय कार्यालयात आज झालेल्या बैठकीला आमदार संजीव रेड्डी बोदकुरवार, जिल्हा भाजपा अध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर अध्यक्ष डॉ.मंगेश गुलवाडे, माजी नगराध्यक्ष हरीश शर्मा, उपमहापौर राहुल पावडे, प्रकाश धारणे, काशी सिंग, नीलेश खरबडे, अशिष देवतळे, अजय दुबे, राहुल घोटेकर, प्रमोद क्षीरसागर, प्रा रवि जोगी, स्वप्नील कांबळे, रामकुमार अक्कापल्लीवार, तसेच जलनगर चंद्रपूर आणि शांतीनगर बल्लारपूर येथील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बाबासाहेब आणि जयभीम



आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ज्ञानाचे सिम्बॉल मानले जाते. विचार हे बाबासाहेबांचे सर्वश्रेष्ठ शास्त्र होते. त्याच बळावर बाबासाहेबांपुढे जग आज नतमस्तक होत आहे. साऱ्या जगात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, तत्त्वज्ञान अंगिकारले जात आहे. भारतीय संविधान जगातील अनेक देश त्यांच्या देशात लागू करण्याच्या मनस्थितीत आहेत. भारतीय संविधान म्हणजे मानवाचे जीवन सुखी करण्याची व जगण्याची लाईफलाईन आहे. या संविधानाने देशाला प्रत्येक क्षेत्रात योगदान देणारे विचार दिले आहेत. देश समृद्ध व्हावा आणि शोषित पिडित माणूस सुखी व्हावा ही अपेक्षा ठेवून येथे लोकशाही मानली पाहिजे यासाठी बाबासाहेबांनी अहोरात्र कष्ट सोसले.मानापमान सहन केला. आज बाबासाहेबांच्या विचारांना हजारो लोक समजून घेत आहेत. त्याचा नवीन नवीन पद्धतीने अन्वयार्थ लावत आहेत. लोकांचे लक्ष त्याकडे वेधून घेत आहेत. विचार, वाचन, कृती आणि संघठन यातून सर्वांना सुखी होता येईल असे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान सांगते.



प्रासंगिक
डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

स्वातंत्र्य, समता,न्याय, बंधुता या चातूर्सुत्री तत्वांचा अवलंब करणाऱ्या आंबेडकरी विचारांचे बाळकडू घेऊन वैचारिकदृष्ट्या तत्त्वज्ञान प्राप्त आंबेडकरी अनुयायी मोठ्या प्रमाणात लेखनाकडे वळले आहेत.

आजघडीला त्यांच्या विचारांवर सर्वाधिक ग्रंथ लिहिले जात आहे. त्यावर भाष्य केले जात आहे. लोक प्रचंड स्वरूपात बाबासाहेबांच्या विचारांची पुस्तके विकतात. बाजारात बाबाची पुस्तके दिसली की लोकं ते पैसे घेऊन विकत घेतात आणि वाचून त्यातून नवे नवे अन्वयार्थ, विचार लावण्याचा प्रयत्न करतात. पुस्तके वाचली की माणसे नवे विचार करतात. त्या विचारातुन माणसे शहाणी होतात.

आणि या शहाणपणातूनच देशाची वैचारिक उंची गाठली जाते.

समाजाला योग्य दिशा मिळावी, सर्वसमाज सुखी व्हावा हा उद्देश आंबेडकरी विचारसरणीचा आहे.

अलीकडे वाचन कमी झाले आहे अशी ओरड नेहमीच ऐकायला येत असलीतरी ती ओरड आंबेडकरी चळवळीच्या बाबतीत लागू पडतं नाही. ती केवळ पोट भरलेल्यांच्या बाबतीत लागू पडते. माणसाने माणसांशी माणसांप्रमाणे वागले पाहिजे. माणूस म्हणून वागले पाहिजे. माणूस म्हणून वागवले पाहिजे. माणूस म्हणून जगू दिले पाहिजे. कारण हे सर्व जग स्वतः माणसांसाठीच आहे. जगात माणूस सर्वश्रेष्ठ आहे. हेच तत्वज्ञान आंबेडकरांचा विचार सांगतो.

डॉ. बाबासाहेब ज्ञानाच्या बळावर लढले आणि त्यांनी ज्ञानाच्या बळावरच शोषितांना मुक्त केले. बाबासाहेबांचे विचार ही मानवमुक्तीची चळवळ आहे. ती आपले ज्ञान वाढले पाहिजे असा संदेश देते. आंबेडकरी विचारांचे पुस्तकांशी एक अजोड असे नाते आहे.वाचन संस्कृती विकसित झाली पाहिजे हा विचार आंबेडकरी विचार देतो.

वाचाल तरच वाचाल हा विचार बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी मनापासून स्वीकारलेला दिसतो. वाचल्याशिवाय वाचणारच नाहीत हे आज सगळ्यांना कळून चुकले आहे. आज बाबासाहेबांवर लाखोंच्या संख्येने ग्रंथसंपदा निर्माण झाली. लाखो गाणे, काव्य आणि ग्रंथ लिहिले गेले. अजूनही लिहिल्या जात आहेत. त्या ग्रंथांवर वेगळे भाष्य होत आहेत. जगात एवढे भाग्य कोणत्याही महापुरुषाला लाभले असेल असे वाटत नाही. माणसाच्या मनात एकदा बाबासाहेब बसले की त्यांचे विचार मनात रुजून राहतात. एक बाबासाहेबांचा विचार हजारो अनुयायी निर्माण करतात. आज ते बाबासाहेबांचे अनुकरण व अनुसरण कसे करता येईल याकडे वळले आहेत. ती मंडळी प्रचंड भाषण करत आहेत. आणि ऐकायलाही मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहत आहे.

वाचन वाढविले की पुस्तके महाग होतात. बाबासाहेबांनी शिका म्हटले, लाखो करोडो लोक शिकले. ज्ञानवंत आणि शहाणे झाले. बाबासाहेबांच्या विविध कार्यक्रमांच्या वेळी लाखो रुपयांची पुस्तके हातोहात विकली जातात. बाबासाहेबांनी लोकांना विचारांची व वाचनाची आवड लावली. त्यांच्या वाचनाचा वारसा कमालीचा चालू आहे. आज करोडो लोक बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक बनत आहेत. त्यांच्या पुस्तकांचे, ग्रंथांचे वाचक आहेत. बाबासाहेबांनी आपले सारे आयुष्य शोषितांचे आयुष्य सुखमय करण्यासाठी, त्यांच्या ज्ञानाची भूक वाढण्यासाठी घालविले. त्यांनी ग्रंथांवर प्रेम केले. बाबासाहेबांना मानणारा बराच मोठा वर्ग आजही त्यांच्या विचारांचे अनुकरण करीत ग्रंथांवर प्रेम करत आहेत. ग्रंथांचे वाचन करत आहेत. ही गौरवास्पद बाब आहे.

आज बाबासाहेब शरीररूपाने आपल्यात नसले तरी ग्रंथरूपाने ते आपल्यामध्ये आहेत. या ग्रंथांवर प्रेम करणारा मोठा वर्ग आज समाजामध्ये आहे. या ग्रंथांच्या माध्यमातून आज बाबासाहेब लाखो करोडो लोकांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. बाबासाहेबांच्या विचारांमुळे कोटी कोटी कुळाचा उद्धार झाला आहे. कोट्यावधी लोकांचे जीवनमान सुधारले आहे. माणूस असूनही अधिकार नसलेल्या माणसांना बाबासाहेबांनी माणूसपण दिले. जगण्याचे नवे बळ दिले.जी माणसं बाबासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिली ती आपले जीवन संपन्न करून घेत आहे.

बाबासाहेब हे कुणा एका विशिष्ट जातीचे, धर्माचे नव्हते. तर ते सर्व मानवजातीचे उद्धारकर्ते होते. त्यांनी आपल्या कृती आणि वाणीतून सर्व प्रकारच्या समाजातील लोकांसाठी शोषित पिडितांसाठी अहोरात्र कष्ट करीत वाचन लेखन करीत शोषितांना नवीन आयाम देण्याचा प्रयत्न केला. अमानवीय प्रथा परंपरातून बाहेर काढून मानवतावादी दृष्टिकोन बहाल केला. आणि सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिले.आज तळागाळातील माणूस लोकशाहीचे फायदे घेतो ते केवळ बाबासाहेबांमुळे. त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळे. जगात बाबासाहेब नसते तर संविधान नसते. सर्वसामान्य शोषित पुरुषाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला असता काय? असा प्रश्न मनात निर्माण होतो.

बाबासाहेबांपासून प्रेरणा घेतलेला जयभीम हा शब्द मानवतावादी विचारांना प्रेरणा देणारा आहे. केवळ जयभीम या एका शब्दाने लाखो-करोडो लोकांच्या मनात जगण्याचे आत्मबळ, जगण्याचा विश्वास निर्माण झाला आहे. केवळ या एका जयभीम शब्दामुळे सारे जग एकमेकाच्या जवळ आले आणि सगेसोयरे बनले. आंबेडकरी चळवळीत बाबासाहेबांच्या एवढेच जयभीम या शब्दालासुद्धा महत्त्व आहे. इतरत्र विखुरलेल्यांना एका माळेत ओवणारा जयभीम शब्द मानवतावादी विचारांना प्रेरणा देणारा, दिशा देणारा कोडवर्ड ठरला आहे. आजच्या महत्वपूर्ण दिनी जयभीम गर्जत जातीपातीचे बंधन तोडून एकत्र येण्याचा व एकमेकांच्या हातांना धरून मानवतावादी, समतावादी विचारांना पुढे नेण्याचा संकल्प करूया.



# झेंडा निळा म्हणाला



१४ एप्रिल, म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या आणि त्यांच्या विचारधारेचा स्विकार करणाऱ्या समस्त जनांचा आनंदाचा दिवस. कारण ज्या व्यवस्थेने येथील दलितांना जीवन जगणे नाकारले होते, त्यांना माणुस म्हणून हीन ठरविले होते अशा दलितांच्या जीवनात प्रकाश टाकनाऱ्या आणि त्यांच्यात आत्मसम्मानाची भावना जागृत करणाऱ्या महामानवाचा जयंती दिवस होय. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कार्यकर्तुत्वातून समस्त दलितांना न्याय देण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेबांचे प्रत्येक आंदोलन हे मानवमुक्तीचे आंदोलन होते. कारण ज्या दलित समाजाला गुलामीची वागणूक दिली जात होती त्यांचे जगणे असह्य झाले होते अशा दलित समाजातील गुलामीच्या बेडया डॉ. बाबासाहेबांच्या संघर्षाने टुटून पडल्या. कारण म्हणतात ना, 'झाले गुलाम मोकळे.. भिमा तुझ्या जन्मामुळे..' हे मात्र खरे आहे.

डॉ. बाबासाहेबांची जयंती म्हटली की, संपूर्ण देशात मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. कारण तो दिवस दलितांच्या जीवनातील पर्वणीच असते. कारण तो आपल्या बापाचा जयंती दिवस असतो असे प्रत्येक दलितांना वाटते. आणि ते वाटणे स्वाभाविकसुद्धा आहे. कारण बाबासाहेबच नसते तर कदाचित दलितांच्या जीवनात माणुसकीचा सूर्य कधी उगवलाच नसता. बाबासाहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने सगळा परिसर हा निळा निळा होवून जातो. सगळीकडे निळे तोरण व निळे झेंडे लावून परिसर हा सजविल्या जातो. बाबासाहेबांच्या जयंतीदिनी सर्व दलित समाज एकत्र येवून मोठ्या आनंदाने ढोल ताशांच्या व डीजेच्या गजरात बाबासाहेबांचा फोटो डोक्यावर घेवून नाचतात आणि बाबासाहेबांची जयंती साजरी करतात. ती केली सुद्धा पाहिजे या मताचा मी आहे. कारण ज्या दलितांना येथील वर्णव्यवस्थेने त्यांचे सर्व अधिकार नाकारत आनंदाचे सर्व क्षण नाकारले होते ते आनंदाचे क्षण बाबासाहेबांच्या जयंती निमित्ताने दलितांच्या जीवनात परत आले असे म्हणण्यात काहीच हरकत नाही. हे सगळे खरे असले तरी मला मात्र एक प्रश्न नेहमीच पडतो की दलित समाज डॉ. बाबासाहेबांवर एवढा प्रचंड प्रेम करतो मग बाबासाहेबाची चळवळ का थांबली? बाबासाहेबांना अभिप्रेत असलेले सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तन का झाले नाही? कारण आम्ही १४ एप्रिल आली की आमच्या बापाची जयंती आहे म्हणून बाबासाहेबांचा फोटो डोक्यावर घेवून नाचण्यात स्वतःला धन्य मानले आणि बाबासाहेबांचे विचार हे डोक्यात न जाता फक्त डोक्यावरच राहीले. म्हणून आजही आम्ही सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या एक नाही ही वास्तविकता आहे.

आपण अनेकदा असे बघितले असतील की १४ एप्रिल जवळ आली की काही दिवसांपूर्वी पासुनच दलित समाजातील लोक ही जयंती साजरी करण्यासाठी तयारीला लागतात. मोठ्या प्रमाणात बुद्ध विहारात जयंती साजरी केली जाते. परंतु ही शोकांतिका आहे की बऱ्याच विहारात बाबासाहेबांची जयंती साजरी झाली की त्या विहाराकडे फिरकत सुद्धा नाही. जे विहार दलित समाजाचे प्रेरणास्थान व्हावे, ज्या विहारातून दलित समाजाच्या युवा पीढिला सामाजिक आणि धार्मिक ज्ञान मिळावे आणि दलित समाजात उद्याचे भविष्य निर्माण व्हावे अशा पवित्र बुद्ध विहाराकडे दलित समाजाने पाहण्याची आणि समजून घेण्याची मानसिकता सुद्धा बदलविणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. कारण समस्त दलित समाजाच्या विचारांच्या आदानप्रदानाचे व आस्थेचे केंद्र आहे असे माझे स्पष्ट मत आहे. कारण बाबासाहेबांची जयंती साजरी करत असतांना बाबासाहेबांची चळवळ मागे का आली याचा सुद्धा शोध घेणे तितकेच महत्वाचे आहे. दलित समाजाची प्रत्येक स्तरावर होत चाललेली पिछेहाट लक्षात घेता आता तरी दलित समाजातील प्रत्येक व्यक्तिने मग तो सामाजिक कार्यकर्ता असो की राजकीय पुढारी असो मतभेद विसरून बाबासाहेबांच्या विचारांचा गाडा समोर नेण्यासाठी एकत्र आले पाहिजे. कारण शत्रु आपल्या मानगुटीवर येवून बसला आहे आणि आम्ही आजही जर बाबासाहेबांचा निळा झेंडा डोक्यावर घेवून नाचण्यातच स्वतःला धन्य समजत असाल तर समाज समोर जाईल कसा? हा मात्र फार मोठा प्रश्न आहे. म्हणून दलित समाजाचे उद्याचे भविष्य लक्षात घेता आणि बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली क्रांति घडविण्यासाठी बाबासाहेबांच्या जयंतीदिनी सर्व दलितांनी व आंबेडकरी अनुयायांनी निळ्या झेंड्याची शपथ घेत मी समस्त दलित समाजाला आव्हान करतो की,

**'एका घरात यारे झेंडा निळा म्हणाला..**
**हातात हात द्या रे झेंडा निळा म्हणाला..'**



विशेष आलेख
डॉ. कपिल मून
सदस्य - सल्लागार
समिति, संघर्ष ॲग्रो वर्धा.
मो. ९६५७६७४४४३



# शोषित, वंचितांचे कैवारी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न, प्रज्ञासूर्य, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, ज्ञानयोगी, परिवर्तनाचा अग्रदूत, सामाजिक समतेचा महानायक, महामानव, घटनाकार, बॅरिस्टर, कायदेपंडीत, विश्वरत्न, शोषितांचे, वंचितांचे कैवारी, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आदींचे अभ्यासक, तत्वज्ञ, समाजसुधारक, राजकारणी, संपादक, महिला कामगार हक्काचे समर्थक, संविधानाचे शिल्पकार, शिक्षणतज्ञ, प्रकांड पंडित अशा कितीतरी विशेषणांनी व्यापलेले नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर. अगदी अण्णाभाऊ साठे यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास 'जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भीमराव".

लेखक
डॉ.राजू पाटोदकर
उपसंचालक (माहिती), पुणे विभाग, पुणे

१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. डॉ. बाबासाहेबांनी वंचित आणि शोषितांसाठी कार्य केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या, महिलांच्या समस्यांचा अभ्यास करुन उपाय सुचवले. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील कार्यास विनम्र अभिवादन.

डॉ.बाबासाहेबांनी तमाम वंचित आणि शोषितांसाठी कार्य केले. खास करुन शेतकरी, शेतमजूरआणि महिलांच्या समस्यांची विशेष चिकित्सा करुन त्यावर उपाय सुचवले. शेतकऱ्यांचे कमालीचे शोषण करणारी खोती पद्धत कोकणात अस्तित्वात होती. खोती पद्धतीचे प्राबल्य नष्ट करण्यासाठी बाबासाहेबांनी लढा दिला. ठराविक कालावधीच्या अंतराने येणारा दुष्काळ हे शेतकऱ्याचे मोठे दु:ख आहे. अशा प्रसंगी शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी त्यांनी विविध योजना सुचवल्या. त्यापैकीच एक म्हणजे 'पीक विमा योजना'. शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने शेती न करता आधुनिक पद्धतीने शेती करावी याकरिता नद्या जोड प्रकल्प, सिंचनाचे प्रकल्प आदी महत्त्वाच्या योजना होत्या. शेतीसाठी मुबलक व स्वस्त दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबतही डॉ.बाबासाहेब आग्रही होते. त्यांनी राज्यघटनेच्या कलमानुसार शेतकऱ्यांसाठी खास लवाद निर्माण करण्याची तरतूद निर्माण केली.

डॉ.बाबासाहेबांच्या लेखनात, वाचनात व चिंतनात प्रचंड ताकद, शक्ती होती. ज्ञानसंपादनाच्या शक्तीमुळेच व्यक्ती, समाज, राज्य आणि राष्ट्र महान बनते याची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. त्यांनी आपल्या लिखाणातून व कार्यातून तळागाळातील माणूस जागा केला. त्यांना आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता याची जाणीव करुन दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले.

दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा मांडण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी १९२० साली पहिले मराठी पाक्षिक 'मूकनायक' सुरु केले.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपल्या कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. तत्कालीन समाजातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या घटकाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी डॉ.आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात सांगितले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते जो पिईल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे ते सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असेही ते म्हणत. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षणाने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी सांगितली. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय व्हावीत. मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे असे ते नेहमी म्हणत.

दरवर्षी भारतरत्न डॉ. आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. परंतु, गेल्या दोन वर्षापासून 'कोरोना' विषाणूचा सामना करत असताना सर्वच उत्सव घरातल्या घरात साधेपणाने साजरे करावे लागले. आता 'कोव्हिड-१९' रुग्णांचे प्रमाण कमी झाल्याने शासनाने निर्बंध शिथिल केले आहेत. त्यामुळे जयंतीदिनी अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. कोरोनाची वाढ पुन्हा होऊ नये म्हणून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे व स्वतःही काळजी घ्यावी.

सर्वांना समान न्याय, समता व बंधुत्वाच्या विचारांची प्रेरणा देऊन देशाला संविधानिक दिशा देणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती राज्यभरात ६ एप्रिल पासून दहा दिवस साजरी करण्यात येत आहे. सामाजिक न्याय व विशेषसहाय विभागाच्या नियोजनानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाच्यावतीने 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम' १६ एप्रिल पर्यंत राबविण्यात येईल.



मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार

# चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये वर्षानुवर्ष होत आहे कंत्राटी कामगारांचे आर्थिक शोषण

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये मागील अनेक वर्षापासून मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार विविध कामासाठी विविध कंत्राटदाराकडे कार्यरत आहे. सिल्को मॅगनीजचे उत्पादन घेत असलेल्या चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये कामगारांची अवस्था फार दयनीय आहे. प्लांटमध्ये स्थायी कंत्राटी कामगार जवळपास ३००, अस्थायी कंत्राटी कामगार ४०० ते ४५० , कंपनी रोल वरील स्थायी कामगार १०० ते १२० तसेच अधिकारी वर्ग ६० ते ६५ एवढे आहेत. एकूण आकडेवारी पाहता सी ए पी उद्योग कंत्राटी कामगारांच्या भरोशावर चालतो आहे व चांगले उत्पादन घेत आहे.असे असूनही कंत्राटदार व



अधिकारी दोघेही मिळून कंत्राटी कामगारांच्या आर्थिक शोषण करत आहे. केंद्र सरकार अंतर्गत येणाऱ्या चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये काही कामगारांना केंद्र सरकारचे वेतन तर काही कामगारांना महाराष्ट्र सरकारचे वेतन दिले जात आहे. केंद्राच्या एकाच प्लांटमध्ये दोन वेगवेगळे वेतन धोरण राबविण्यात येत आहे. ही कामगारांवर फार अन्यायकारक बाब आहे. वेतनामध्ये अनियमितता असणे, कुठलीही आरोग्य सेवा व इतर सोयी सुविधा न देणे तसेच कामगारांचे होणारे आर्थिक शोषण आदी अन्याया विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना मराठी कामगार सेनेतर्फे कामगारांना न्याय मिळवून देण्यास आवाज उचलण्यात आला.

चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये मनसेची मराठी कामगार सेना युनियन सक्रिय आहे व प्लांटमध्ये

> टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये मागील अनेक वर्षापासून मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार विविध कामासाठी विविध कंत्राटदाराकडे कार्यरत आहे. सिल्को मॅगनीजचे उत्पादन घेत असलेल्या चंद्रपूर फेरो अलॉय प्लांटमध्ये कामगारांची अवस्था फार दयनीय आहे.

९५ टक्के कामगार मराठी कामगार सेनेचे युनियनचे सदस्य आहेत. केंद्र सरकार अंतर्गत सुरू असलेल्या प्लांटमध्ये अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने अशाप्रकारे कामगारांचे आर्थिक शोषण होणे ही फार गंभीर बाब आहे. कामगार कायद्याप्रमाणे कंत्राटी कामगारांना किमान वेतन न देणे, महिन्याच्या सात किंवा दहा तारखेपर्यंत वेतन न देणे, कामगारांना वेतन स्लिप न देणे ,वेतन कामगारांच्या बँक खात्यात जमा न करणे,टेंडर प्रमाणे सुरक्षितेचे साहित्य न पुरविणे, ई एस आय सी मेडिकल सुविधा न पुरविणे, कामगारांचा विमा न उतरवणे आदी सर्व अन्याय प्लॉटमधील कंत्राटदार कंत्राटी कामगारांवर करत आहे आणि हा सर्व अन्याय होत असताना चंद्रपूर फेरो आलेय प्लांट कामगारांची जबाबदारी कंत्राटदारांवर ढकलत आहे.

कामगारांना भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणूक करा याबाबतचे निवेदन नगरसेवक महाराष्ट्र राज्य सचिव सचिन भोयर यांनी चंद्रपूर फेरो आलेय प्लांटचे मुख्य कार्यकारी निदेशक मोरेश्वर झोडे यांना देण्याकरिता गेले असता झोडे यांनी भेट देण्यास नकार दिला. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. कामगारांच्या समस्यांचे निवेदन घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात मनसैनिक व कामगारांना सोबत घेऊन सचिन भोयर यांनी लगेच काम बंद आंदोलन पुकारले व अधिकाऱ्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. कंपनीचे काम ठप्प होताच अखेर कार्यकारी निदेशक मोरेश्वर झोडे यांनी निवेदन स्वीकारण्यास होकार देत निवेदन स्वीकारले व चर्चा केली. याचर्चे दरम्यान कामगारांना प्लांटमध्ये भेडसावणाऱ्या सर्व समस्या निकाली काढा नियमाप्रमाणे सर्व सोयी, सुविधा व भत्ते लागू करा . सर्व समस्या १४ दिवसाच्या आत सोडवणूक करा अन्यथा मनसे तर्फे कामबंद आंदोलन करण्यात येईल असा स्पष्ट इशारा मनसे नगरसेवक सचिन भोयर यांनी प्रशासनाला दिला आहे. निवेदनाच्या प्रती केंद्रीय कामगार मंत्री भूपेंद्र यादव ,राज्य कामगार मंत्री हसन मुश्रीफ, केंद्रीय श्रमआयुक्त देवेंद्र राव ,सहाय्यक कामगार आयुक्त जानवी भोईटे, जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, पोलीस अधीक्षक अरविंद साळवे आदी सर्वांना देण्यात आल्या आहे. चर्चेदरम्यान मनसे मराठी कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन भोयर ,संजय फरदे, मंगेश चौधरी, राकेश पराडकर, चिरंजीव पॉल, अनिकेत सातपुते ,शुभम ठाकूर, अंकित मिसाळ आदी सह महाराष्ट्र सैनिक व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोंडपिपरीत राष्ट्रपिता ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेबांची संयुक्त जयंती समारोह

**गोंडपिपरी / प्रतिनिधी**
गोंडपीपरी येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दिनांक १४ व १५ एप्रिलला जनता कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता क्रांतीबा ज्योतिबा फुले तथा विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १४ एप्रिल ला सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण करण्यात येणार असून सायंकाळी पाच वाजता संविधान चौकातून भव्य भीम जयंती मिरवणूक शहराच्या मुख्य रस्त्याने काढून शिवाजी चौकात समारोप करण्यात येणार आहे. दिनांक १५ एप्रिलला सायंकाळी पाच वाजता आंबेडकरी विचारवंत तथा जेष्ठ साहित्यिक उद्धवराव नारनवरे यांचे अध्यक्षतेत कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. रवि तावडे हे प्रबोधन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतील व स्वागताध्यक्ष म्हणून प्रा.मिलिंद उराडे उपस्थित राहतील. दैनिक जनतेचा महानायकचे संपादक सुनील खोब्रागडे हे ङ'आंबेडकरी चळवळीची सद्यस्थिती आव्हाने दिशा व उपाय'ङ या विषयावर मार्गदर्शन करणार. सविधानाचे अभ्यासात रुपेश निमसरकार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अपेक्षित लोकशाही या विषयावर मार्गदर्शन करणार तर तनुजा रायपुरे, सामाजिक कार्यकर्त्या ह्या स्त्री मुक्तीचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरङ या विषयावर तर गडचिरोलीचे वैद्य मापणशास्त्र अधिकारी रूपचंद फुलझले हे 'क्रांतीबा ज्योतिबा फुले व संघर्षगाथा' या विषयावर प्रकाश टाकणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी तहसीलदार के. डी. मेश्राम, ठाणेदार जीवन राजगुरू ,नगराध्यक्ष सरिता कुळमेथे, उपाध्यक्ष सरिका मडावी , ए. बा. वी. प्रकल्पाधिकारी एस. आर. पारखी, बीडीओ बुलकुंडे , गटशिक्षनाधिकारी समाधान भसारकर , वैद्यकीय अधिकारी नितीन पेंदाम, अभियंता एन. डी.वैद्य, कृषी अधिकारी मंगेश पवार, मुख्याधिकारी सिद्धार्थ मेश्राम , उपविभागीय वन अधिकारी आलापल्ली नितेश देवगडे , अन्नपुरवठा निरीक्षण संघपाल मेश्राम , विदयुत मंडळाचे मुख्य अभियंता अरविंद काटकर , कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य सुधीर पोटवार , चिंतामणी महाविद्यालयाचे प्राचार्य चक्रधर निखाडे, जनता विद्यालय धाबा येथिल माजी प्राचार्य एस. एन. पेंढारकर, प्राचार्य प्रदीप बामनकर, प्राचार्य दुर्गे, नगरसेवक यादव बांबोडे, वनिता देवगडे, मनीषा दुर्योधन , प्रतिष्ठित व्यापारी मोरेश्वर सूरकर, प्रसिद्ध कवी अरुण झगडकर, सामाजिक कार्यकर्ते सुनील फलके व आकाश झाडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे . रात्रो आठ वाजता 'भीम गीतांची सुरेल मैफल' संगीतमय तथा प्रबोधनात्मक सुरेंद्र डोंगरे सादर करणार आहेत. सर्व कार्यक्रमांना बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आव्हान नितेश डोंगरे, राजू झाडे ,कमल खोब्रागडे , यांनी केली आहे.

## पालकमंत्री वडेट्टीवार यांचा चंद्रपूर जिल्हा दौरा

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
राज्याचे आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे



पालकमंत्री विजय वडेट्टीवार जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून गुरुवार, दि. १४ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १०.४५ वाजता शासकीय विश्रामगृह, चंद्रपूर येथे आगमन व राखीव. सकाळी ११ वाजता सामाजिक न्याय भवन, चंद्रपूर येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीनिमित्य सामाजिक समता कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२.१५ वाजता चंद्रपूर जिल्हा व शहर कमेटीच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीनिमित्य फुटपाथ विक्रेत्यांना निशुल्क ग्रिष्मकालीन छत्र्यांचे वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२.४५ ते १ वाजेपर्यंत राखीव. दुपारी १ वाजता चंद्रपूर येथुन सिंदेवाहीकडे प्रयाण. दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह, सिंदेवाही येथे आगमन व राखीव. दुपारी २.१५ वाजता वनविभाग सभागृह, सिंदेवाही येथे उपवनसंरक्षक ब्रम्हपूरीच्या वतीने आयोजित डॉ. शामाप्रसाद मुखर्जी जनवन विकास योजनेंतर्गत प्रमाणपत्रांचे वितरण कार्यक्रमासह अन्य आयोजित कार्यक्रमांना उपस्थिती राहणार आहे.

## रब्बी हंगाम धान खरेदी नोंदणीला सुरुवात

### ३० एप्रिल पर्यंत शेतकऱ्यांनी नोंदणी करावी

**ब्रम्हपुरी / प्रतिनिधी**
पणन हंगाम २०२१-२२ ( रब्बी ) मध्ये धान तसेच भरडधान्य खरेदीकरीता शेतकऱ्यांची एनईएमएल ( नश्थ ) पोर्टलद्वारे दि. ११ ते ३० एप्रिल २०२२ या कालावधीत ऑनलाईन नोंदणी करावी, चंद्रपूर जिल्हा मार्केटिंग अधिकारी अनिल गोगीरवार यांनी केले आहे .

राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २०२१-२२ ( रब्बी ) मधील धान खरेदीसाठी दि. १ मे ते ३० जून, २०२२ असा कालावधी निश्चित केला आहे. शासनाच्या वतीने खरीप हंगामात आधारभूत हमीभावाने धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्यात येते. त्याच अनुषंगाने रब्बी हंगामातीलही धान खरेदी करता यावा, यासाठी ऑनलाईन पद्धतीने सात-बाऱ्याची नोंदणी एनईएमएल पोर्टलद्वारे सुरू केली आहे. ही नोंदणी येत्या ३० एप्रिलपर्यंत करावयाची असून, नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांचे धान आधारभूत धान खरेदी केंद्रावर घेण्यात येणार आहे. रब्बी हंगाम २०२१-२२ मध्ये रब्बीचे धान सरकारी आधारभूत किमतीने सोसायटीमध्ये विकण्यासाठी त्यांच्या सात-बाराची नोंदणी ११ ते ३० एप्रिलपर्यंत २०२२ या कालावधीत करावयाचे आहे व धानाची विक्री दिनांक १ मे ते ३० जून २०२२ या कालावधीत केंद्रावर करावयाची आहे. ज्या शेतकऱ्यांचे सात-बारा १ ते ३० एप्रिल २०२२ या दरम्यान ऑनलाईन रजिस्ट्रेशन झाले असेल, त्यांनाच सरकारी धान खरेदी केंद्रावर धान विकता येईल. ज्याचे ऑनलाईन ३० एप्रिल २०२२ पर्यंत झाले नसल्यास, ते सरकारी आधारभूत किमतीवर धान विकू शकणार नाहीत. याची नोंद घ्यावी आणि रब्बीची फसल घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी तत्काळ संबंधित सोसायटीमध्ये ३० एप्रिलच्या आधी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून घ्यावे. नोंदणीकरिता सातबाऱ्यावर रब्बी चा पीक पेरा असणे आवश्यक आहे .असे आवाहन आहे.चंद्रपुर जिल्हा मार्केटिंग अधिकारी अनिल गोगीरवार यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त व्याख्यान मालेचे आयोजन

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
या दिनांक १२ एप्रिल २०२२ ला चंद्रपुर जिल्हा बार एसोसिएशन तर्फे महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले. आजच्या या कार्यक्रमात सन्माननीय वरिष्ठ अधिवक्ता व विधितज्ञ आदरणीय ॲड.भीमरावजी रामटेके तर्फे राष्ट्रनिर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विषयावर उद्बोधन करण्यात आले. विश्वरत्न भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल, बाबासाहेबां तर्फे समाजात करण्यात आलेल्या सकारात्मक परिवर्तना बद्दल आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना व कार्यांबद्दल महिती देऊन उपस्थित सर्व सन्माननीय अधिवक्तांचे अमूल्य मार्गदर्शन केले. आजच्या या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अभय पाचपोर, उपाध्यक्ष ॲड.राजेश ठाकूर, सचिव ॲड.आशिष धर्मपुरीवार व असोसिएशनचे सर्व वरिष्ठ अधिवक्ता तथा सहसचिव ॲड.विनायक कार्लेकर, कोषाध्यक्ष ॲड.राजू झुलकंठीवार, ग्रंथपाल ॲड.केनाल सरोजकर कार्यकारिणी सदस्य ॲड.आशिष मुंधडा, ॲड. प्रफुल मुरकुटे, ॲड.उमेश मोहूर्ले, ॲड. कृष्णकांत रासपेल्ली, ॲड. विनोद मोटघरे, ॲड.अविन डोलकर, ॲड.स्नेहा खिरटकर, ॲड.स्नेहा गिरी, ॲड.मंजु लेडांगे, ॲड.राशिद शेख, ॲड.नंदकिशोर राऊत, ॲड.राहुल मेंढे उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.अभय पाचपोर यांनी केले, कार्यक्रमाचे मंच संचालन ॲड.आशिष धर्मपुरीवार यांनी केले आणि आभार प्रदर्शन ॲड.आशिष मुंधडा यांनी केले.

## वीज संकटाला तत्कालीन भाजप सरकार जबाबदार आहे

### ऊर्जा राज्यमंत्री तनपुरे यांचा आरोप

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
सध्या महाराष्ट्रात निर्माण झालेल्या प्रचंड वीज संकटाला कोल इंडियासह तत्कालीन भाजप सरकार जबाबदार असल्याचा आरोप राज्याचे ऊर्जा व नगरविकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आज चंद्रपूर येथे आयोजित पत्रकार पश्रिशदेत केला.

तनपुरे यांनी म्हटले आहे की, सध्या महाराष्ट्रात वीजेचे मोठे संकट असून, राज्यात लोडशेडिंगची समस्या भेडसावत आहे. कोल इंडियाकडून औष्णिक वीज केंद्रांसाठी आवश्यक असलेल्या कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे राज्यातील सर्व औष्णिक वीज केंद्रांना कोळशाच्या तुटवड्याची समस्या भेडसावत आहे. चंद्रपूर वगळता इतर वीज केंद्रांमध्ये केवळ एक-दोन दिवस कोळसा संकलन शिल्लक असल्याने तेथील वीजनिर्मितीवर मोठा परिणाम होत आहे. ते म्हणाले की, कोरोनाच्या काळात लादलेले सर्व निर्बंध हटवल्यामुळे सर्व उद्योग पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. वीज ग्राहकांकडे महावितरणची कोट्यवधीची थकबाकी आहे, त्यापैकी शेतकऱ्यांची सर्वाधिक थकबाकी आहे,

## राजुऱ्याच्या रमानगर मधील नरेशच्या मृत्यू प्रकरणी दोन आरोपी अटकेत

**राजुरा / प्रतिनिधी**
येतील रामनगर वार्डात राहणाऱ्या नरेश गजभिये या ४० वर्षीय युवकांचे हातपाय बांधून खून केल्याची घटना समोर आली आहे.मृतक नरेश यांच्या आई सुमन गजभिये यांच्या तक्रारीनंतर दोन आरोपीवर भादवि ३०४,३४ कलमानव्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्हीही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मृतक नरेश यांच्या आई सुमनबाई प्रेमदास गजभिये यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार नरेश हा वेडसर असल्याने वार्डात शिवीगाळ



व मारहाण करीत होता.घटनेच्या दिवशी मृतक हा शेजारील आशा आगलावे या महिलेला मारहाण करीत होता.महिलेला मारहाण करीत असतांना मृतकची आई सुध्दा सोडविण्यासाठी गेली.

मारहाणीची माहिती महिलेचे पती विठ्ठल शंकर आगलावे यांना कळताच त्यांनी प्रदीप माणुसमारे यांच्या मदतीने नरेशचे हातपाय बांधून घरातील पलंगाला बांधले.त्यानंतर मुलगा नरेश चा मृत्यू झाला असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पण निव्वळ हातपाय बांधल्याने नरेशचा मृत्यू झाला नाही असे प्रत्यक्षदर्शीचे म्हणणे आहे.

नरेशचे हातपाय घट्ट बांधून त्याचा गळा आवळण्यात आला असावा असे स्पष्ट होत आहे.या मृत्यूप्रकरणी आरोपी विठ्ठल आगलावे व प्रदीप माणुसमारे यांच्या विरोधात भादवि ३०४,३४ कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे.

## नागभीड शहरासोबत ग्रामीण भागातही विद्युत नियमित सुरू ठेवा

**नागभीड / प्रतिनिधी**
विद्युत विभागाने शहरी भागातील विद्युत नियमित सुरू ठेवून ग्रामीण भागात लोडशेडींग चा शेडूल सांगून ग्रामीण भागातील विद्युत बंद ठेवणे सुरू असल्यामुळे ग्रामीण भागावर अन्याय होत आहे, त्यामुळे आज नवखळा येथील नागरिक विद्युत विभागावर धडक देऊन नागभीड शहर सोबत ग्रामीण भागातही विद्युत नियमित सुरू ठेवा असे निवेदनात मागणी केली आहे.सध्या लोडशेडींग संदर्भात लोडसेडींग सुरू झाल्याची चर्चा सुरू आहेत,

परंतु नागभीड शहरात केव्हाही विद्युत पुरवठा नियमित सुरू असते मात्र नवखळा सह ग्रामीण भागात वारंवार विद्युत पुरवठा खंडित केले जातो, व रात्री च्या वेळेस नवखळा ला अगदी लागून असलेल्या नागभीड ची विद्युत नियमित चकचकीत सुरू असते मात्र



> कृषी नगर सह नागभीड शहरातील फ्रिडर ए ग्रूप मध्ये आहेत त्यामुळे या परिसरात लोडशेडींग लागू नाही .बाकी इ आणि एफ या परिसर साठी लोडशेडींग लागू आहे, इ आणि एफ या ग्रूप मध्ये पूर्ण ग्रामीण भाग येतो म्हणजे पूर्ण ग्रामीण भागात लोडशेडींन टप्प्या टप्पा ने लागू असल्याचे शेडूल आहे,
>
> **-उप कार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग**

नवखळा येथील लाईन वारंवार बंद केली जातो, हे योग्य नाही, कारण नवखळा गाव सुध्दा नागभीड नगर परिषद मध्ये समाविष्ट केला आहे. त्यामुळे सिटीसर्वे व दुय्यम निबंधक कार्यालय (खरेदी विक्री ), व इतर कार्यालयात शासकीय फि ग्रामीण च्या तुलनेत नवखळा गाव शहरी भागात येतो म्हणून जास्त फि घेतली जातो, मग विविध फि घेण्यासाठी नवखळा वासियांना शहरी भागाचे नियम लागू आहेत, तर विद्युत पुरवठा बाबतीत हे नियम का नाही . असाही प्रश्न उपस्थित केला, नागभीड शहरातील स्थानिक राज्यकर्त्यानी फक्त आपल्या परिवरचा विचार करून नागभीड शहराला ए गृप फ्रिडर

> नागभीड शहरातील राज्य कर्त्यानीच शेडूल ठरविला असेल म्हणून नागभीड शहरात लोडशेडींग नाही, रात्रीच्या लोडशेडींन मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची नुकसान होत आहे. रात्रीच्या वेळी लाईन गेल्यास विद्यार्थ्यांना दिवा लावायला राकेल नाही, तर कसे अभ्यास करणार ,काही वर्षा आधी शासनाने राकेल बंद केला . तेव्हा पासून अनेक अडचणी येत आहेत, ग्रामीण भागात आज तर राकेल ची अतिआवशकता आहे, पावसाळ्यात मयतीच्या शरणावरील काही ओले लाकडे जाळण्यासाठी राकेलच नाही. आमच्या विद्यार्थ्यांना लाईट मध्ये अभ्यास करण्याची सवय पडली आहे, नागभीड शहरातील राज्यकर्त्यानी फक्त आपल्या घराचा विचार करून ग्रामीण भागावर अन्याय केला आहे,
>
> **- आशा गायकवाड नगरसेविका नवखळा प्रभाग नागभीड,**

ठरवून नागभीड शहरासाठी लोडशेडींग लागू नाही .असा शेडूल ठरविले आहे , हे योग्य नाही नागभीड शहर प्रमाणे आम्हाला सुध्दा समान हक्क द्यावा .

नवखळा सह ग्रामीण भागातही विद्युत पुरवठा नियमित सुरू ठेवावे असे मा. उप कार्यकारी अभियंता कारगावकर महावितरण उपविभाग नागभीड यांना निवेदनात म्हटले आहे. यावेळी स्थानिक नगरसेविका आशा अरूण गायकवाड , प्रतिक रामटेके, शुभम गेडाम, आशिष गेडाम, सुनिल नारनवरे, रूपेश गेडाम, अनिकेत गेडाम, रोशन गेडाम, विपुल मेश्राम, लोकेश सोनटक्के, पराग खापर्डे, अनुराग गोंगले, लोकेश कावळे, संतोष जिवतोडे, प्रवेश बगडे, संतोष ठाकरे, प्रमोद सहारे, जगदीश माथनकर, उपस्थित होते.

## भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने बसले अधिकाऱ्याच्या टेबल खाली

### नारंडा येथील तलावाचे सौंदर्यीकरणाचे अंदाजपत्रक बनविण्यास अधिकाऱ्यांकडून दिरंगाई

**कोरपना / प्रतिनिधी**
'सरकारी काम अन, बारा महिने थांब' यांच म्हणीचा प्रयत्न शासकीय कामांमध्ये येत असतो सरकारी काम म्हटलं की नागरिकांना कामांकरिता वारंवार शासकीय कार्यलयाचे उंबरठे झिजवावे लागतात तरी सुद्धा त्यांचे काम काही होत नाही,त्यामुळेच नागरिकांच्या मनात शासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यप्रणाली बद्दल प्रचंड रोष असतो. त्याच अनुषंगाने कोरपना तालुक्यातील नारंडा येथील तलावाच्या सौंदर्यीकरणासंदर्भातील अंदाजपत्रक बनविण्याबाबत विषय आहे.याबाबत भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी श्याम नारनवरे जिल्हा जलसंधारण अधिकारी लघु पाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे वारंवार सदर कामाच्या मंजुरी करीता



अंदाजपत्रक बनविण्याकरिता विनंती केली.त्यानंतर त्यांनी सुद्धा आपल्या कनिष्ठ अधिकारी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, उपविभाग राजुरा यांना यासंदर्भात तोंडी वजा लेखी आदेश दिले परंतु त्यांनीसुद्धा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखली.

भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी वारंवार याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्याकडे मागील १ वर्षापासून याबाबत पाठपुरावा केला परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केले.

त्यामुळे तलावाच्या सौंदर्यीकरणाचे अंदाजपत्रक तयार होऊ शकले नाही. त्यांच अनुषंगाने १२ एप्रिल २०२२ रोजी भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने हे नेहमी प्रमाणे तलावाच्या अंदाजपत्रकरीता जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्याकडे गेले असता त्यांनी त्यासंदर्भात विचारणा केली असता, उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्याकडून अद्यापही अंदाजपत्रक आपल्याकडे प्राप्त झाले नाही असे सांगण्यात आले.

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार



# आंबेडकरी अनुयायी, संघटनातर्फे
# आज विविध कार्यक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा रिपब्लिकन पक्ष व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर जयंती महोत्सव समिती चंद्रपूर शाखेच्यावतीने भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महानगरात विविध कार्यक्रमांचे आयोजन गुरुवार १४ एप्रिल रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात करण्यात आले आहे. गुरुवार १४ एप्रिल रोजी अकाली ६ वाजता 'भीम पहाट' बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम होणार त्यानंतर सकाळी ८.१५ वाजता समता सैनिक दलतर्फे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व मनवंदना कार्यक्रम होईल. सकाळी ९.३० वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार व बुद्ध वंदनाचा कार्यक्रम पार पडेल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्ष गीता रामटेके राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी अजय गुल्हाने जिल्हा पोलीस अधीक्षक अरविंद साळवे, जिपच्या मुख्य कार्यपालन अधिकारी डॉक्टर मिताली शेट्टी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर अशोक नितनवरे, मुख्य संयोजक प्रवीण हेमचंद्र खोब्रागडे, निर्मला नगराळे आदींची उपस्थिती राहील.

- सकाळी ११ ते २ या कालावधीत वर्तमान परिस्थितीमध्ये बाबासाहेबांच्या अनुयायांची भूमिका यावर परिसंवाद पार पडणार आहे. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी बहुजन एम्प्लाइज फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजकुमार जवादे राहतील. प्रमुख वक्ते म्हणून आंबेडकरी विचारवंत डॉक्टर उमेदी इंनाच, सविधान मोर्चाचे अध्यक्ष प्रकाश लोखंडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर विवेक बांबोडे, तर विनोद नगराळे प्राध्यापक डॉक्टर टी. डी. कोसे, प्रा. रोशन फुलकर, विजय तोडासे, शेषराव सहारे, अशोक फुलझेले, अशोक टेंभरे, राजेश रंगारी, प्रेमदास बोरकर, हरिदास देवगडे, धनजय तावाडे यांची उपस्थिती राहील. प्रास्ताविक ज्योती शिवणकर करतील. संचालन प्रतिभा मुन तर आभार अमोल गोवर्धन मानतील.
- दुपारी २ ते ४ या वेळात महानगरातील स्थानिक कलाकारांतर्फे बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम पार पडेल. दुपारी ४ ते ५ या वेळात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर जयंती महोत्सव समितीचे सर्व माजी पदाधिकारी सदस्य व महानगरातील मान्यवरांचा सत्कार कार्यक्रम होईल या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते प्रतीक बोर्डीकर राहते प्रास्ताविक विजय करमरकर करतील संचालन महादेव कांबळे तर आभार अंजली नीमगडे मानतील.
- सायंकाळी ५ ते ७ या कालावधीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक धोरण या विषयावर परिसंवाद पार पडणार आहे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी विचारवंत मृणाल कांबळे राहतील प्रमुख वक्ते म्हणून युट्युबर नेहा ठोंबरे ज्येष्ठ विधिज्ञ एडवोकेट वैशाली टॉंगे, डॉक्टर कल्पना कवाडे यांची तर प्रमुख मुख्य अतिथी म्हणून निर्मला पाटील प्रेरणा करमरकर अश्विनी आवळे अश्विनी खोब्रागडे नंदा जीवने लीना खोब्रागडे ममता सातपुते राजश्री शेंडे राजकला रंगारी स्वरूपा रामटेके तेलंग वैजंतीमाला पाटील मनीषा कांबळे छाया बोरकर उज्वल गलबले सरिता सोनटक्के आदींची उपस्थिती राहील प्रास्ताविक गौतमी फुललेले करतील संचालन नेहा डांगे तर आभार प्रदर्शन पंचकूला वेलेकर करणार आहेत सायंकाळी सात ते दहा या कालावधीत सांस्कृतिक कार्यक्रम पार पडेल साहिल भारती व संच बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम सादर करतील.

# १६ दिवसांनी कुजलेला अवस्थेत आढळला मंगेशाचा मृतदेह



**नागभीड /प्रतिनिधी**
पोलिस स्टेशन अंतर्गत रानपरसोडी जंगलात इसमाचा कुजलेल्या अवस्थेत प्रेत मिळाला ,मंगेश निळकंठ शिवणकर (३५) रा. कोसंबीगवळी ता. नागभीड असे मृतकाचे नाव असून आज सकाळच्या सुमारास गावातील मोहाफुल संकलन करणाऱ्यां व्यक्तीना त्या ठिकाणी दुर्गंधी यायला लागली असता तर त्या ठिकाणी कुजलेल्या अवस्थेत प्रेत दिसून आला. सदर प्रेत वन विभागाच्या जागेत असल्यामुळे वन विभाग चे कर्मचारी व पोलिस घटना स्थळ गाठून सदर मृतकाच्या खिशात आधार कार्ड मिळाला आधार वरून व कपड्यावरून सदर कुजलेला प्रेत हा मंगेश निळकंठ शिवणकर रा. कोसंबीगवळी याच व्यक्ती चा असल्याचे निष्पन्न झाले. मृतक हा आपल्या कुटुंबातील लग्न दिनांक २४ मार्च २०२२ ला लग्न आटोपून नेहमी प्रमाणे बाहेर जिल्ह्यातील कंपनी मध्ये कामावर गेला असेल असा अंदाज मनात ठेवून घरची मंडळी होते. परंतु गावा लगत च्या झुडपी जंगलात मंगेश चा प्रेत कुजलेल्या अवस्थेत मिळाल्याने एकच खळबळ माजली व घरच्यांना मानसिक शॉक बसला , म्हणजे मंगेश हा कुटुंबातील लग्न आटोपून बाहेर जिल्ह्यात कंपनीच्या कामावर गेलाच नाही असा अंदाज घरचे घेऊन मंगेश हा लग्न नंतर म्हणजे २५ ते २६ मार्च २०२२ ला मरण पावला असेल म्हणून आज पर्यंत पूर्णतः कुजलेल्या अवस्थेत प्रेत मिळाला.

# शासनाचे कोटी रुपये खर्च होऊनही रोडाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे बांधकाम

**मूल /प्रतिनिधी**
विशेष सुधारणा निधी अंतर्गत करण्यात येत असलेल्या ७ कोटी रूपये खर्चाच्या शहरातील रस्ते बांधकाम सुरु करण्यात आले असून काम करणारे कंत्राटदार शासकीय नियम धाब्यावर बसवुन निकृष्ठ दर्जाचे काम करीत असल्याने आणि बांधकाम विभागाचे जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी निकृष्ठ बांधकाम लपविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नागरिकांनी बोलून दाखविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या रोडचे बांधकाम सुरू करण्याचा अगोदर रस्ता स्वछ करुन त्यावर मुरुम टाकायला पाहिजे होते. परंतु सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रातच मुरुम उत्खनन करणे थांबविण्यात आले असल्याने सदर



रोडवर मातीवरच उएँ पसरवून रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च होऊनही रस्ता किती दिवस टिकणार असा प्रश्नही मुलच्या नागरिकांकडून केल्या जात आहे. एवढेच नव्हे तर ज्या ठिकाणी दाट लोकवस्ती आहे त्याठिकानचे रस्ते अजूनही झालेले नाही. परंतु जिथे घरे नाही तिथेही रोडाचे काम सुरु करुन शासनाच्या विशेष सुधारणा निधी विनाकारण खर्च केल्या जात असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. शहरातील प्रभाग क्रं. ७ आणि ८ मध्ये रस्ते आणि नालीचे बांधकाम करण्यासाठी ७ कोटी रूपये प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या ७ कोटी रूपयांमधुन नियोजित रस्ते आणि नाल्यांचे बांधकाम व्यवस्थित, नियमानुसार आणि आवश्यक व उत्तम साहीत्य वापरून होणे अपेक्षित आहे. परंतु सदर कामाचे कंत्राटदार डि.व्ही.पटेल अँण्ड कंपनी नियोजित रस्ते आणि नाल्यांचे बांधकाम निवीदेतील अटी आणि शर्थींना धाब्यावर बसवुन केल्या जात असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. निवीदेतील अटी आणि शर्थीनुसार सिमेंट रस्ते आणि नाली बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराकडे क्रॉंक्रेट बँचमिक्स प्लॉन्ट असणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित कंत्राटदार बँचमिक्स प्लॉन्ट विना काम करीत असुन असे करतांना सिमेंट नालीचे बांधकामाचे जागेवरच क्रॉंक्रीट मिक्स करून निकृष्ठ व हलक्या प्रतिचे बांधकाम साहीत्य वापरून करीत आहे. नाली बांधकामासाठी लाकडी सेन्ट्रींगचा वापर न करता लोंखडी सेन्ट्रींगचा वापर करावा, नाली बांधकाम करतांना रस्त्यावरील पाणी नाली व्दारे वाहुन जाण्यासाठी विप होल तयार करून त्याठिकाणी प्लॉस्टीक पाईप लावणे गरजेचे आहे. नालीचे बांधकाम मजबुत आणि प्रमाणशीर होण्यासाठी निडल वायब्रेटरने बांधकाम साहीत्याची दबाई करणे आवश्यक आहे. परंतु सदर नाली बांधकामात निडल वायब्रेटरचा वापरच होत नसल्याचे पाहणीत दिसुन आले. बांधकाम सुरू करण्यापुर्वी करून दिलेल्या करारनाम्यानुसार नालीचे बांधकाम मजबुत होण्यासाठी ४३ ग्रेटचा ओपीसी सिमेंटचा वापर होणे अनिवार्य आहे.













